**नांदेड जिल्हयातील नांदेड (०२), हिमायतनगर (०६), हदगांव (०४), माहुर (०३), देगलुर (०३), व बिलोली (१४) या तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या ३२ वाळुघाटांकरीता दि २१.१२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

नांदेड जिल्हयातील नांदेड, हिमायतनगर, हदगांव, माहुर, देगलुर व बिलोली या तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या ३२ वाळुघाटांकरीता दि २१.१२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली.

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. २१ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे घेणेकरीता मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं बीओ/जेडी(डब्लुपीसी)/पीएच/बी-२२११२३-एफटीस-०१३० दि २३/११/२०२२ अन्वये खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. मा. जिल्हाधिकारी नांदेड<br>तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड | -- | अध्यक्ष |
| २. प्रादेशिक अधिकारी,<br>म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | -- | सदस्य |
| ३. उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म. प्र.नि. मंडळ, नांदेड. | -- | समन्वयक |

मा. जिल्हाधिकारी नांदेड तथा समिती अध्यक्ष यांच्या मान्यतेने सर्वप्रथम श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नांदेड तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरणप्रेमी गट, स्थानिक व इतर प्रतिनिधी यांचे हार्दिक स्वागत केले. समिती समन्वयक यांनी पुढे सांगितले की, या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीची सुचना भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणी प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र मराठी वृत्तपत्र दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया ३० दिवस आधी दि १९.११.२०२२ रोजी देण्यात आली होती.

तसेच प्रस्तवित ३२ वाळु घाटासंबंधीत वाळु उत्खननाच्या पर्यावरणी व्यवस्थापन आराखाडाचा मसुदा कार्यकारी सारांश इंग्रजी व मराठी भाषेतील प्रती भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता विविध शासकिय कार्यालय तथा स्थानिक ग्रामपंचायत येथे सुचना/हरकती ई-मेल किंवा लेखी स्वरूपात देण्याबाबतचे आवाहन/जाहीर प्रकटन ३० दिवस आधी केले होते. सदील जाहीर प्रकटनाच्या अनुषंगाने या कार्यालयास एकही निवेदन प्राप्त झाले नाही.

तद्नंतर समिती समन्वयक यांनी प्रकल्प धारकास विनंती केली की त्यांनी या प्रस्तावित ३२ वाळु घाटासंबंधीची पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तावाकरीता पर्यावरण विषयक लोकजाहीर सुनावणीचे सादरीकरण करावे.


प्रकल्प धारकानी सदरील प्रकल्प व पर्यावरण मुद्याविषयाबाबतचे खालील प्रमाणे सविस्तर सादरीकरण केले

# सारांश:-

## 1. परिचय

- नांदेड जिल्हयातील नांदेड, हिमायतनगर, हदगाव, माहूर, देगलूर आणि बिलोली या तालुक्यातील 32 वाळूघाट लिलावासाठी पर्यावरण मंजुरी मागीतली आहे.
- महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक: संकीर्ण- 2019/ पी.के.०१ / ता.के.3.दिनांक 03 डिसेंबर, 2019 नुसार 05 हेक्टरपेक्षा कमी खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घेणे आवश्यक आहे.
- M/s. Rightsource Industrial Solutions Pvt. Ltd. यांना जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे मार्फत वाळूघाटांसाठी पर्यावरण मंजुरी प्राप्त करुन देण्याचे काम देण्यात आलेले आहे.
- Form-1M, PFR, EMP, RA, DSR मधील अर्ज आणि वाळूघाटांसाठी मंजुर खाणकाम आराखडा त्यासोबत पर्यावरण मंजुरी साठी जन सुनावणीची कार्यवाही करण्यात येईल.

## 2. स्थान नकाशा



## 3. वाळूच्या ठिकाणांची यादी

### Annexure-I

| Sr. No. | Name of Sand Ghat | Name of Sand Ghat | Name of Taluka | Name of River | Nearest Survey No. | Length x Bredth x Approved depth in mtr. | Total Depth in m | Area in Ha. | Quantity of Sand Brass |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Jaitapur | Jaitapur | Nanded | Godavari | 104, 105, 111, 114 | 260x40x0.50 | 2.50 | 1.04 | 1837 |
| 2 | Kotitirth | Kotitirth | Nanded | Godavari | 56, 58, 60, 71, 82, 94, 95, 96, 97, 98 | 260x40x0.50 | 2.50 | 1.04 | 1837 |
| 3 | Kamari | Kamari | Himayatnagar | Painganga | 181, 182, 183, 184 | 260x40x0.50 | 2.50 | 1.04 | 1837 |
| 4 | Dighi | Dighi | Himayatnagar | Painganga | 12, 13 | 150x80x0.50 | 2.50 | 1.20 | 2120 |
| 5 | Gharapur | Gharapur | Himayatnagar | Painganga | 72, 73, 76 | 180x60x0.50 | 2.50 | 1.08 | 1908 |
| 6 | Dhanora (J.) | Dhanora (J.) | Himayatnagar | Painganga | 74, 75, 76, 78 | 160x65x0.50 | 2.50 | 1.04 | 1837 |
| 7 | Palaspur | Palaspur | Himayatnagar | Painganga | 98, 99, 100, 101 | 200x70x0.50 | 2.50 | 1.40 | 2473 |
| 8 | Sirpalli (J.) | Sirpalli (J.) | Himayatnagar | Painganga | 131, 132, 134 | 200x60x0.50 | 2.50 | 1.20 | 2120 |
| 9 | Gorlegaon-2 | Gorlegao | Hadgaon | Painganga | 133, 134, 135, 136 | 400x25x0.50 | 2.50 | 1.00 | 1767 |
| 10 | Belmandal | Belmandal | Hadgaon | Painganga | 1, 5, 6, 6/1, 6/2, 6/3, 9 | 500x20x0.50 | 2.50 | 1.00 | 1767 |
| 11 | Gurfali-1 | Gurfali | Hadgaon | Painganga | 5, 6, 7, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19 | 500x20x0.50 | 2.50 | 1.00 | 1767 |
| 12 | Gurfali-2 | Gurfali | Hadgaon | Painganga | 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36 | 600x20x0.50 | 2.50 | 1.20 | 2120 |
| 13 | Takali | Takali | Mahur | Painganga | 7, 8, 9, 83, 84, 85, 86, 87 | 250x50x0.50 | 2.50 | 1.25 | 2208 |
| 14 | Sayfal | Sayfal | Mahur | Painganga | 2, 4, 5, 6 | 300x35x0.75 | 2.50 | 1.05 | 2783 |
| 15 | Lanji | Lanji | Mahur | Painganga | 15, 16, 17, 78, 79 | 250x50x0.50 | 2.50 | 1.25 | 2208 |
| 16 | Shekhapur | Shekhapur | Degloor | Manjara | 146, 147, 21, 22, 23, 27 | 424x90x0.50 | 2.50 | 3.82 | 6742 |
| 17 | Shelgaon-3 | Shelgaon | Degloor | Manjara | 66, 67, 68 | 410x100x0.50 | 2.50 | 4.10 | 7244 |
| 18 | Medankallur | Medankallur | Degloor | Lendi | 82, 83, 84, 225, 226, 228 | 700x40x0.50 | 2.50 | 2.80 | 4947 |
| 19 | Sagroli-1 | Sagroli | Biloli | Manjara | 361, 362 | 210x230x1.00 | 2.50 | 4.83 | 17067 |
| 20 | Sagroli-2 | Sagroli | Biloli | Manjara | 451, 457, 459, 460 | 480x100x1.00 | 2.50 | 4.80 | 16961 |
| 21 | Sagroli-3 | Sagroli | Biloli | Manjara | 334, 335 | 450x100x1.00 | 2.50 | 4.50 | 15901 |
| 22 | Yesagi-3 | Yesagi | Biloli | Manjara | 233 center Side | 330x150x1.00 | 2.50 | 4.95 | 17491 |
| 23 | Bolegaon-1 | Bolegaon | Biloli | Manjara | 288 center Side | 308x160x1.00 | 2.50 | 4.93 | 17413 |
| 24 | Bolegaon-2 | Bolegaon | Biloli | Manjara | 320 East Side | 310x160x1.00 | 2.50 | 4.96 | 17527 |
| 25 | Bolegaon-3 | Bolegaon | Biloli | Manjara | 320 West Side | 300x160x1.00 | 2.50 | 4.80 | 16961 |
| 26 | Ganjagaon-3 | Ganjgaon | Biloli | Manjara | 297, 299 | 410x120x1.00 | 2.50 | 4.92 | 17385 |
| 27 | Ganjagaon-5 | Ganjgaon | Biloli | Manjara | 357, 358 | 490x100x1.00 | 2.50 | 4.90 | 17314 |
| 28 | Karla Bu.-3 | Karla Bu. | Biloli | Manjara | 100, 101, 109 | 350x110x1.00 | 2.50 | 3.85 | 13604 |
| 29 | Machnoor-1 | Machnoor | Biloli | Manjara | 14 | 290x170x1.00 | 2.50 | 4.93 | 17420 |
| 30 | Machnoor-2 | Machnoor | Biloli | Manjara | 28, 29, 30, 31 | 380x130x1.00 | 2.50 | 4.94 | 17456 |
| 31 | Machnoor-5 | Machnoor | Biloli | Manjara | 52,58 | 210x175x1.00 | 2.50 | 3.68 | 12986 |
| 32 | Hungunda | Hungunda | Biloli | Manjara | 256, 352 | 295x150x1.00 | 2.50 | 4.43 | 15636 |

Additional Collector, Nanded

4.**खाणकाम पद्धती**:-

१.उत्खननाची पध्दत:- ड्रिलींग आणि ब्लास्टिंग पध्दतीचा वापर न करता वाळू घाटातून वाळूचे उत्खनन करण्यात येईल. फक्त कुदळ, फावडी, घमेले यासारख्या साधनांचा वापर करुन मंजूरांव्दारे कोरडया नदी पात्रातून वाळूचे उत्खनन करण्यात येईल.

- रेती घाटातील रेतीचा अंदाज घेण्यासाठी खालील प्रक्रिया अवलंबली जाते:

- रेती घाटाचे सीमांकन आणि बेंचमार्किंग १०m x १०m मिनिटांच्या अंतरानुसार केले जाते.
- प्रत्येक ग्रीडमधील वाळूची खोली शोधण्यासाठी ऑजर ड्रिलरचा वापर केला जातो.
- १०mx१०m ग्रिडपॅटर्न वापरून रेती घाटातील छिद्रे तयार करण्यासाठी ऑजर ड्रिलरचा वापर केला जातो.
- मापन टेप वापरून छिद्रांची खोली मोजली जाते.
- सर्व रीडिंग्सची सरासरी काढल्यानंतर रेतीची गहराई आणि घाटाची गणना केली गेली.

२. आवश्यक यंत्रसामग्री/उपकरणे: हुकुम, घमेला, ट्रॅक्टर विथट्रॉली.

३. वाहतूक: ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे वाळूच्या ठिकाणापासून स्टॉकयार्ड आणि ग्राहकांपर्यंत.

४. पुनर्संचय: मान्सून नंतर आपोआप भरून काढले जाईल. वृक्षारोपण नदीकाठावर आणि वाहतूक रस्त्यालगत केले जाईल.

**५. पर्यावरण व्यवस्थापन योजना:-**

i.वायू प्रदुषण नियंत्रण उपाय:-

- वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या कच्या रोडवर वेळोवेळी पाणी शिंपडले जाईल.
- ट्रॅक्टर ट्राली व ट्रकवर ताडपत्री अच्छादुनच वाळूची वाहतुक टप्या- टप्याने केली जाते.
- वाहतुकीदरम्यान वाळूची गळती होणार नाही याची पुरेपुर काळजी घेण्यात येईल.
- नदीकाठी व वाळूच्या जागे जवळीत मोकळया जागेवर वृक्षारोपण केले जाईल.

ii.ध्वनी नियंत्रण उपाय:-

- उत्खनन व वाळू वाहतुक केवळ दिवसा केली जाईल.
- अल्प प्रमाणात ध्वनीप्रदुषण अपेक्षि असेल.
- गाडयांचा आवाज कमी करण्यासाठी वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांची नियमित देखभाल केली जाईल.
- वाळू वाहतुक वाहनांच्या गती नियंत्रीत केल्या जातील.

iii.जल प्रदुषण नियंत्रण उपाय:-

- वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या पात्रातुनच केले जाईल.
- उत्खनन केलेल्या खड्याची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीपेक्षा वर ठेवली जाईल.
- नदीचा प्रवाह कृतीमरित्या वळविला जाणार नाहीत.
- नदी पात्रातज वाहने धुण्यास मनाई राहील.
- उत्खननातुन कोणत्याही सांडपाण्याचा प्रवाह तयार होणार नाही.
- कामगारांसाठी फिरते शौचालयांची व्यवस्था राहील.
- पावसाळयात आणि पुरात उत्खनन टाळण्यात येईल. जेणे करुन नविन वाळूचा थर जमा होण्यास मदत होईल.

iv.जमीन पर्यावरण:-

- कोरडया नदीच्या पात्रात वाळू उत्खननामुळे तात्पुरते खड्डे तयार होतील, जे पावसाळयात पुन्हा भरुन येतील.
- नदीच्या रुंदीच्या तीन मीटर किंवा रुंदीच्या १/१० व्या जागेचे सुरक्षा अंतर नदीच्या काठापासुन (as per "Sustainable sand mining guidelines") सोडले जाईल.
- पॉलिथीन पिशवी, जुट पिशवी इत्यादी कचरा नदीच्या पात्रात राहु/सांडण्याची परवानगी राहणार नाही.
- उत्खननास दिलेल्या परवानगी पेक्षा जास्त उत्खनन होणार नाही.
- नदीकाठी आणि जवळपास मोकळया जागेवर वृक्षारोपण केले जाईल.

v. हरित पट्टा निर्माण योजना:-

| | |
|---|---|
| ग्रीनबेल्टचे स्थान | पट्ट्याच्या दोन्ही बाजूंच्या नदीकाठच्या बाहेरील बाऊंड्री व रोड कडेला |
| लागवड होणारी झाडे | हेक्टरी ५०० रोपे |
| रोपांमधील अंतर | ३ मीटर ग्रिड मध्यांतर |
| प्रजाती निवड | चांगल्या प्रजातींची शिफारस केली जाईल. |

वृक्षारोपणासाठी चांगल्या प्रजातींची शिफारस

| वृक्षाच्या जातीचे नाव | स्थानिक नाव | महत्व |
|---|---|---|
| आझादिरक्ता इंडिका | कडुलिंब | कडुलिंबाचे तेल आणि कडुलिंबाचे पदार्थ |
| टेक्टोना ग्रँडिस | टीक | बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ, प्रतिजैविक, अँटी अल्सर |
| फिकस रिलिओसिया | पिपंळ | औषधी उपयोगी फळे |

| | | |
|---|---|---|
| बांबूसा वल्गारिस | बांबू | अँथेलमिंटिक अँटी-इंफ्लेमेटरी, ॲस्ट्रिंजंट प्रॉपटीज |
| मधुका लाफगिफोलिया | महू | उत्तेजक आणि खोकला आराम म्हणून कार्य करते |

**६.व्यावसायिक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापन:-**

- खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे प्रदान केली जातील.
- कान,डोळा आणि हाताचे संरक्षणाची साधणे या व्यतिरिक्त सुरक्षा हेल्मेट आणि पादत्राणे दिली जातील.
- कामगारांसाठी डस्ट मास्क देण्यात येईल.
- खाण कामगारांसाठी पिण्याच्या पाणयासाठी सोय करुन देण्यात येईल.
- खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल.

**७.निष्कर्ष:-**

- नांदेड जिल्हयातील नांदेड, हिमायतनगर, हदगाव, माहूर, देगलूर आणि बिलोली या तालुक्यातील 32 वाळूघाटांचे उत्खनन क्षेत्र हे ५ हेक्टर पेक्षा कमी आहे. त्यामुळेवाळूघाट हे , MoEF आणि CC मार्गदर्शक तत्त्वांनुसार B२ श्रेणी अंतर्गत येतात.
- उत्खननाच्या कमी प्रमाणामुळे पर्यावरणावर पिरणाम होण्याची शक्यता नाही आणि त्यामुळे हे जवळपासच्या गावाच्या फायद्याचे ठरेल.
- उत्खननाच्या छोट्या प्रमाणामुळे वाळूघाटांचा पर्यावरणावर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता नाही आणि ते जवळपासच्या समुदायासाठी फायदेशीर ठरतील.
- प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक रहिवाशांना अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
- प्रस्तावित प्रकल्प सामाजिक पायाभूत सुविधा आणि क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी देखील सकारात्मक योगदान देईल.
- हवा, पाणी, ध्वनी, माती, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी सर्व पर्यावरणीय समस्या MoEF आणि CC मार्गदर्शक तत्त्वांनुसार हाताळल्या जातील.

उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नांदेड तथा समन्वयक गठीत लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आवाहन केले.

## जनसुनावणीची नोंद (प्रोसीडींग) :

| अ. क्रं. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्ये | प्रकल्प प्रतिनिधीने दिलेले उत्तर | जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया सुचना |
|---|---|---|---|
| १ | **श्री. किशोर पाटील, ग्रामस्थ रा. शेकापुर, ता. देगलुर जि. नांदेड यांनी खालिल मुद्या उपस्थित केला की,**<br>आमचे गावाचे नाव शेकापुर-शेवाळा असुन ते तेलंगाणा राज्याच्या सिमेवर आहे व मा. जिल्हाधिकारी साहेबांना विनंती केली की, वाळु वाहतुकीला आळा घालण्यासाठी तसेच त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता त्या त्या गावच्या लोकांची समिती गठीत करण्यात यावी. वाळु वाहतुक करतेवेळेस शासनाचा प्रतिनीधी तसेच सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून क्षमतेपेक्षा जास्त वाळु वाहतुक करणाऱ्यावर नियंत्रण राहील तसेच रस्त्यांची दुरावस्था व पिकांचे नुकसान होणार नाही. शासनाने ठरवुन दिलेल्या मार्गदर्शक सुचनांची तसेच नियमांची अमलबजावणी होणे गरजेचे आहे. ज्या वाळुघाटांचा लिलाव झाला आहे अशा वाळूघाटासंबंधीत कामाविषयी तक्रार प्राप्त झाली असल्यास त्या तक्रारीची शहानिशा करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. | | मा. अध्यक्ष पर्यावरण लोकसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी यांनी सुचविले की, आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची नोंद घेतली आहे. तसेच आपली ग्रामस्तरीय व्यवस्थापन संनियंत्रण समिती कार्यान्वित आहे. त्यामुळे आपण उपस्थित केलेल्या अडचणी बऱ्याच प्रमाणात कमी होतील. या जनसुनावणीचा व वाळु घाटांच्या लिलावाचा हेतु हाच असतो की वैध व शाश्वत पध्दतीने वाळुचे उपसा करून लोकांकरीता उपलब्ध करून देण्यात येईल. |
| २ | **श्री. कपील शेंडे, रा. सायफळ, ता. माहुर, जि. नांदेड यांनी उपस्थित केलेले मुद्ये,**<br>गावातील रस्त्यावर शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्यामुळे ३३ फुटांचा रस्ता हा आता ०८ फुटांचा राहीलेला आहे त्यामुळे जाण्यायेण्यासाठी त्रास होत आहे. | | मा. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी असे कळविले की, सदरची बैठक ही प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक बाबींविषयी असुन येथे फक्त पर्यावरणविषयक प्रश्न, सुचना, हरकतीबाबत आपले म्हणणे व्यक्त करण्यात यावे. |
| ३ | **श्री आकाश उत्तम पवार, बी टेक, अंतीम वर्ष यांनी उपस्थित केलेले मुद्ये,**<br>मी येथे जनसुनावणीकरीता उपस्थित आहे व माझे म्हणणे एवढेच आहे की वाळु उत्खननाकरीता ज्या | | मा. अध्यक्ष पर्यावरण लोकसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी यांनी याबाबत संमती दर्शविली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | काही शासनाच्या नियम व अटी आहेत त्याची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. | | |
| | | प्रकल्प प्रवर्तक यांनी संमती दर्शवत असे सुचविले की, सदर बाबीची नोंद घेऊन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येईल. | समन्वयक, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी विचारणा केली की, प्रस्तावित ३२ वाळु घाटांचे सध्याची परीस्थीतीबाबतचे छायाचित्र आपण सादरीकरणामध्ये समाविष्ट केले नाहीत. हायड्रोजिओलॉजीकल व जिओलॉजीकल सर्वे रिपोर्ट यापुर्वी आणी प्रस्तावित असलेल्या वाळु घाटांबाबतचे अहवाल सादरीकरणामध्ये समाविष्ट केले नाहीत ते पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये समाविष्ट करण्यात यावी अशी प्रकल्प धारकास विनंती केली. |

मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की, लोकसुनवणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे लोकसुनावनीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात येईल.

त्यांनतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषित केले.

**(रा. उ. पाटील)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नांदेड

**(अभिजीत राऊत, भाप्रसे)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा जिल्हाधिकारी, नांदेड